**प्रेसनोट दिनांक ३०/०३/२०१९**

**<u>बंडगार्डन पोलीस स्टेशन</u>**

**बंडगार्डन पोलीसांकडून मोटारसायकलचोरासकेली अटक.**

दिनांक २६/०३/२०१९ रोजी रात्रीचे वेळी पुणे स्टेशन परिसरात बंडगार्डन पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना, बातमीदाराकडून मिळालेल्या बातमीवरून इसम विजय जयंत वाघमारे,वय-१९ वर्षे,रा.पुणे फिरस्ता,मुळ पाईपलाईन रोड,आशियाना कॉलनी,घर नं.२३, अहमदनगर हा ग्रे रंगाच्या ॲक्टीव्हा गाडी नं.एमएच/१२/पीपी/७४५८ हिचेसह ताब्यात घेवून त्याचेकडे गाडीबाबत चौकशी केली असता,तो उडवा-उडवीची उत्तरे देवू लागला. त्यास सीआरपीसी ४१(१)(ड) प्रमाणे अटक करून त्याचेकडे तपास केला असता,त्याने ॲक्टीव्हा गाडी ही गुरूवार पेठ येथूनदिनांक २३/०३/२०१९ रोजी चोरी केली आहे असे सांगितले. सदरबाबत खडक पोलीस स्टेशन येथे खात्री केली असता, खडक पो. स्टे. येथे गुरनं.१७०/२०१९,भादंविक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीस सीआरपीसी ४१(१)(ड) मध्ये मुक्त करून, आरोपीस मुद्देमालासह खडक पोलीस स्टेशनच ताब्यात दिलेले आहे.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी,सहा. पोलीसनिरीक्षक संदीप जमदाडे, पोलीस हवालदार,सचिन कदम, पोलीस नाईक, कैलास डुकरे, अय्याज दड्डीकर, पोलीस कर्मचारी निखील जाधव, किरण तळेकर यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे**